## दिनांक १२/03/२०२०

### भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | १९८/२०२० कलम ३७९ भा.द.वि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | महेंद्र प्रेमचंद चोरडीया वय ३८ वर्ष धंद–मजुरी रा.सुभाष चौक बडनेरा जि.अमरावती |
| घटनास्थळ | फिर्यादी चे राहते घरी |
| घटना ता. वेळ | ०८/०३/२०२०चे ०८:३० वा पुर्वी |
| दाखल ता. वेळ | ११/०३/२०२० चे २१:०३ वा |
| आरोपी नाव व पत्ता | राजेश चौधरी रा.सुभाष चौक नवी वस्ती बडनेरा |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी ठिकाणी यातील नमुद संशयीत आरोपी याने फिर्यादी याचे घराचे बाधंकामा वरील लोखंडी बार, टीन, अॅंगल , विटा, रेती असा एकुण ७१००/– रू चा माल चोरून नेला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | मसपोनि गुल्हाणे मॅडम पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर |

### भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती |
| अप क्र. व कलम | अप नं. २६६/२०२० कलम ३०२,१४३,१४७,१४८,१४९,५०४ भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | दिप राजेंद्र करवाडे ` वय २० वर्ष धंदा- शिक्षण रा. विश्राम भवन जवळ जिल्हा परिषद कॉलनी अमरावती |
| आरोपी | १)अक्षय राठोड २) मनिष बाहेकर ३) अनिकेत चिचखेडे व ईतर ३ ते ४ ईसम |
| घटनास्थळ | मार्डी ते अमरावती रोडवर अंबिका नगर अमरावती |
| घटणा ता. वेळ | दि. १०.०३.२०२० चे १४.०० वा. |
| दाखल ता. वेळ | दि.११.०३.२०२० चे ०१.०८ वा. |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | १.२,३ आरोपी अटक बाकी फरार |
| हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादि हे दि. १०.०३.२०२० रोजी त्यांचा मित्र अंकुश तायडे तसेच सोबत ५ मित्र असे धुलीवंदनासाठी राजुरा येथे दारुची पार्टी करणेसाठी गेले असता मागील भांडणाचे कारणन्नावरुन आरोपी १)अक्षय राठोड २) मनिष बाहेकर ३) अनिकेत चिचखेडे व ईतर ३ ते ४ अनोळखी जणांनी एकत्र येवुन फिर्यादी व यातील मयत अंकुश तायडे हे राजुरा येथुन परत येत असतांना मार्डी रोड अंबिका नगर येथे मयत अंकुश तायडे यास १४.४५ वा. चे सुमारास आरोपी अक्षय राठोड व बाहेकर यांनी त्यांचे ईतर ३, ४ मित्रासोबत गैरकायद्याची मंडळी जमवुन हाती लोखंडी रॉड व चाकु असे शस्त्र घेवुन आरोपी अक्षय राठोड याने लोखंडी रॉडने मयत अंकुश तायडेच्या डोक्यावर तसेच मनिष बाहेकर याने चाकुने मयताच्या छातीत पोटात भोकसुन गंभीर जखमी करुन त्याला जिवानीशी ठार मारले अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा ुगन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | सहपोउपनि अरुण मेश्राम ,प ो.स्टे फ्रेजरपुरा, अमरावती. |

### भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती |
| अप क्र. व कलम | अप नं. २६७/२०२० कलम ३०७,१४३,१४८,१४९ , ५०४ भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | प्रकाश बापुराव बाहेकर वय ६३ वर्ष धंदा- भाजी विक्री रा. जलाराम नगर प्रभा कॉलनी अमरावती |
| आरोपी | १)अंकित तायडे २) दिप करवाडे ३) अक्षय माटे ४) सुरज तायडे ५) शुभम गडलींग ६) कुंदन बोरकर ७) प्रेम सरोदे व ईतर २ |
| घटनास्थळ | मार्डी ते अमरावती रोडवर अंबिका नगर अमरावती |
| घटणा ता. वेळ | दि. १०.०३.२०२० चे १४.१० वा. |
| दाखल ता. वेळ | दि.११.०३.२०२० चे ०२.०८ वा. |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | आरोपी क्र. १ (मयत) , आरोपी २ ते ७ अटक |
| हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादीचा मुलगा रंगपंचमी खेळण्याकरीता गेला असता नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी फिर्यादीच्या मुलाचे मित्रासोबत झालेल्या वादानंतर नमुद आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादीच्या मुलाचा मोटर सायकल चा पाठलाग करुन तसेच शिवीगाळ करुन आरोपी क्र. १ याने फि. चे मुलास त्यांचे जवळील चाकुने डाव्या बरगळीत भोसकुन जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा ुगन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | सहपोउपनि अरुण मेश्राम ,प ो.स्टे फ्रेजरपुरा, अमरावती. |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. २६८/२०२० कलम ३२३, ३५४,४४८, ५०४, ५०६ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| आरोपी | मंगेश गोंडाणे वय ३० वर्ष रा. फ्रेजरपुरा बायपास गल्ली नं. ३ गणवीर यांचे घराजवळ अमरावती |
| घटनास्थळ | फ्रेजरपुरा बायपास गल्ली नं. ३ गणवीर यांचे घराजवळ अमरावती |
| घटणा ता. वेळ | दि. ११.०३.२०२० चे ०८.०० वा. सकाळी |
| दाखल ता. वेळ | दि. ११.०३.२०२० चे १४.२८ वा. |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहत असुन आरोपी हा फिर्यादीला नेहमी शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी देतो दि. ११.०३.२०२० चे सकाळी ०८.०० वाजता दरम्यान आरोपी मंगेश गोंडाणे हा फिर्यादीचे घरी दारु पिवुन गेला व मारहाण करुन शिवीगाळ केली तसेच फिर्यादीचे अंगावर जावुन ओढताड केली . व फिर्यादीचे छातीला हात लावुन गावुन फाडला यावेळी फिर्यादी ही एकटीच होती आरोपी हा फिर्यादीला नेहमीच त्रास देतो आरोपीने फिर्यादीच्या घरी येवुन मारहाण केली, शिवीगीळ केली व पाहुन घेण्याची धमकी देवुन फिर्यादीचे अंगावर जावुन छाती दाबली व गावुन फाडला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | मपोउपनि ज्योती बळेगावे पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-५

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.२६९/२०२० कलम २९४,३२३,५०६(ब) भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| आरोपी | मंगेश गोंडाने वय ३० वर्ष रा.फ्रेजरपुरा अमरावती. |
| घटनास्थळ | .भिमज्योत मंडळ गल्ली नं.३ फ्रेजरपुरा अमरावती |
| घटणा ता. वेळ | दि.११.०३.२०२० चे १४.३० वा |
| दाखल ता. वेळ | दि.११.०३.२०२० चे २०.१७ वा |
| हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी आरोपी व त्याची आई यांनी फिर्यादि यांचे घराचा दरवाजा वाजवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व त्यांनी फि.चा गाउन फाडला व जोरजोराने तु यानंतर शेजा-याचे भांडनात पडली तर तुला जीवाने ठार मारल्याशिवाय राहनार नाही ,खतम करुन टाकिल असे म्हणुन मारहान केली तसेच फि.चे पती भांडन सोडविन्याकरीता आले असता त्यांना सुध्दा मारहान केली व अश्लिल शिवीगाळ करुन जीवे मारन्याची धमकी दिली. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला . |
| तपासी अधिकारी | पो.उप.नि.लेवटकर पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-६

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.२७०/२०२० कलम ३६३ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| आरोपी | अज्ञात |
| घटनास्थळ | संजयगांधी नगर नं.२ अमरावती |
| घटणा ता. वेळ | दि.११.०३.२०२० चे १६.३० वा |
| दाखल ता. वेळ | दि.११.०३.२०२० चे २१.०१ वा |
| हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, फि.व त्यांचा मुलगा नामे मिथिलेश किशोर पान्हेकर हा आज दि.११.०३.२०२० रोजी सकाळी ११ .०० वा पासुन घरी होता दुपारी १६.३० वा दरम्यान फि.हि.भांडी धुन्याकरीता घरामध्ये गेली असता फि.यांचा मुलगा मिथिलेश किशोर पान्हेकर वय १० वर्ष रा.संजयगांधी नगर नं.२ अमरावती .हा घराबाहेर गेला फि.ने घरातुन बाहेर येवुन बघितले असता मिथिलेश हा मिळुन आला नाही.त्याचा आजूबाजुला परीसरात शोध घेतला .तसेच नातेवाईकाकडे फोन व्दारे विचारपुस केली असता मिथिलेश हा तिथे आला नाही असे समजले .फि.यांचे मुलाचे वर्णन -उंची ३ ४ फुट ,रंग-गोरा, केस -काळे व बारिक , बांधा सडतापळ, अंगात अबोली रंगाचे फुलबाह्याचे शर्ट व निळया कलरचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| तपासी अधिकारी | पो.उप.नि.लेवटकर पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-७

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर अमरावती |
| अप क्र. व कलम | अप. क्र. २२६/२०२० कलम ३७९ भादवि |
| फिर्यादीचे नाव व पत्ता | महेन्द्र रामभाऊजी भुसाटे वय ४५ वर्ष रा.विलास नगर गल्ली न. ४ अमरावती |
| घटनास्थळ | कृषी उत्पन्न बाजार समीती अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ०९/०३/२०२० चे २२.०० वा ते दि. ११/०३/२०२० चे १०.३० वा. |
| दाखल ता. वेळ | दि. ११/०३/२०२० चे १४.११ वा |
| आरोपी | अनओळखी ईसम |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे आर्ट गॅलरी दुकान असुन दुकानाच्या समोरील पानठेल्याचे ६ x ११ चे प्लॉस्टीकचे शेड कि.अ.२५०० रु. कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले . अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि.संतोष तोकलवाड पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-८

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर अमरावती |
| अप क्र. व कलम | अप क्र २२७/२०२० कलम ३८७ भादवी |
| फिर्यादीचे नाव व पत्ता | फराउद्दीन खतीफ अजउद्दीन खतीफ वय ३० वर्ष रा. पॅराडाईज कॉलनी अमरावती |
| घटनास्थळ | पॅराडाईज कॉलनी अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १०/०३/२०२० चे १२-३० वा. ते १३-०० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. ११/०३/२०२० चे १६-४५ वा. |
| आरोपी | अनओळखी मोबाईल नंबर |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे घरी हजर असतांना त्याचा मो.नं. ८०५५३८२६६९ वर ९९८७७४०६५१ वरून अज्ञात इसमाचा फोन आला व फिर्यादीला म्हणाला की, मी संजय खोडके बोलतो तुमच्या मुलाची इंस्टीट्युट फी २८ हजार ७०० रू. भरावयाची आहे. तुम्ही माझ्या PA सोबत बोलुन घ्या. तुम्हाला माझा PA इंस्टीट्युट चे पैसे देईल ते माझे खाते क्र. ५०५०८४२२५९४ IFC code ALLA०२१२७६८ बॅक ऑफ अलाहाबाद मध्ये जमा करा. असे फोनवर म्हटले व फोन कट केला व फिर्यादीने नंतर फिर्यादीच्या मित्राला फोन करून हकीकत सांगीतली असता फिर्यादीचे मित्राने संजय खोडके यांना फोन करून विचारणा केली असता त्यांनी मी फोन केला नाही व फी भरण्याचे पैसे मागीतले नाही असे सांगीतले. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि.संतोष तोकलवाड पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-९

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर अमरावती |
| अप क्र. व कलम | अप. क्र. २२८/२०२० कलम ४२०, ४६८, ४७१ भादवी |
| फिर्यादीचे नाव व पत्ता | नकुल हरिकृष्ण आळे वय ३५ वर्ष रा. सेतु समिती कार्यालय अमरावती |
| घटनास्थळ | जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ११/०३/२०२० चे ११-०० वा. ते १२-०० वा. |
| दाखल ता. वेळ | दि. ११/०३/२०२० चे २०-१६ वा. |
| आरोपी | निखिल भोयर |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीने जिल्हाधिकारी कार्यालय अम. येथे नोकरी लावुन देतो असे म्हणुन योगेश किरनाके व त्याचे मित्राकडुन प्रत्येकी २००० रू. व ३००० रू. असे घेतले. व मा. जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती या नावाने रूजु होण्याबाबत बनावट आदेश दिला. नमुद आरोपीने शासनाचे अधिकाराचा दुरूपयोग केला. अशा क्र. कक्ष सेतु विभाग/अका/कावी-५७/२०२० दि. ११/०३/२०२० चे लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि.संतोष तोकलवाड पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१०

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर अमरावती |
| अप क्र. व कलम | अप. क्र. २२९/२०२० कलम ३४१, ३५४(ड),५०४ भादवी सहकलम १२ पोक्सो |
| फिर्यादीचे नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | केवल कॉलनी अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १०/०३/२०२० चे १०-०० वा. |
| दाखल ता. वेळ | दि. ११/०३/२०२० चे २३-४९ वा. |
| आरोपी | अनिकेत धनवाडे |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा ऑगस्ट २०१९ पासुन फिर्यादीस त्रास देत होता. त्याच्याविरूध्द पो.स्टे. ला तक्रार दिली होती परंतु त्याचा पाठलाग करणे बंद झाला नाही. दि १०/०३/२०२० चे १०-०० वा. फिर्यादी हि मैत्रीणीचा वाढदिवस असल्याने तिच्या घरी जात असतांना आरोपीने फिर्यादीस केवल कॉलनी ला दुचाकीने समोर येवुन फिर्यादीस रस्ता अडवुन शिवीगाळ केली व म्हटले की, केस मागे घेवुन टाक व आरोपी हा नेहमी पाठलाग करते व मानसिक त्रास देत राहते. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | मसपोनि पुजा खांडेकर, पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-११

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | ८६/२०२० कलम ४५४, ३८० भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | फिर्यादीचे राहते घरी ताजनगर नं. २ अमरावती |
| घटना. ता .वेळ | ११/३/२०२० चे १२/०० वा ते १६/०० वा दरम्यान |
| दाखल .ता. वेळ | ११/३/२०२० चे १९/२५ वा |
| आरोपी | अज्ञात |
| हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता.वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे कुटुंबासह कुलुप लावुन ईलाजाकरिता गेले व सायंकाळी १६/०० वा घरी परत आले असता घराचे कंपाउंडचे व दरवाज्याचे कुलुप तुटलेले दिसले व अलमारी उघडी दिसुन त्यातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले पाहणी केली असता लॉंकर तोडलेले दिसले व त्यातील (१) पाच ग्रॉं सोन्याचा सेवन पीस हार कि. २०,०००/- रुपये, (२) पंधरा तोळ्याच्या पायातील चांदीची पट्टी कि. ७५००/- रुपये , (३) नगदी ५००/- रुच्या २० नोटा एकुन १०,०००/- रुपये असा एकुन ३७५००/- रुचा माल कुणी तरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याचे दिसले अशा फिर्यादीचे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | सपोनि राहुल जाधव पोस्टे नागपुरी गेट अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | वलगांव |
| अप क्र. व कलम | १४३/२०२० कलम २९४,५०४,५०६(ब),३४भादवी सहकलम ४,२५ आर्म अँक्ट (शस्त्र अधिनियम १९५९) |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| आरोपी . | १)उमेश उत्तमराव सोळंके वय ३५ वर्ष २)उत्तमराव सोळंके वय ६० वर्ष ३)एक महीला वय ५५ वर्ष तिन्ही रा.हिंगणी मिर्झापुर ता.दर्यापुर जि.अमरावती ४)ज्ञानेश्वर भिमराव चव्हाण वय ४० वर्ष रा.बस स्टॅन्ड मागे दर्यापुर |
| घटनास्थळ | ग्राम साउर |
| घटना.ता.वेळ | १०/०३/२०२० चे ०७/३० वा दरम्यान |
| दाखल ता.वेळ | ११/०३/२०२० चे १६/११ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकानी यातील फिर्यादी तिच्या आई वडीलांच्या घरी असतांना यातील आरोपी पती याने फिर्यादीच्या घरासमोर येवुन फिर्यादीला व तिच्या वडीलाला अश्लील शिवीगाळ केली. व तलवार दाखवुन जिवाने मारण्याची धमकी दिली.तसेच फिर्यादीचे सासरे सासु व आरोपीचा जावई हे फिर्यादीला मारण्यास प्रोत्साहन देतात अशा लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकॉं पाडुरंग दंडारे ब.न.६२५ पो स्टे वलगांव |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | वलगांव |
| अप क्र. व कलम | १४६/२०२० कलम ५०४,५०६(ब) भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | नरेंद्र नानाजी देशमुख वया ४० वर्ष रा.जबरेश्वर चौक वलगांव |
| आरोपी . | सोहम उर्फ सोनु सुरेश कोठारे वय २३ वर्ष रा. बनारसेपुरा जबरेश्वर चौक वलगांव |
| घटनास्थळ | जबरेश्वर चौक वलगांव |
| घटना.ता.वेळ | ११/०३/२०२० चे १९/०० वा दरम्यान |
| दाखल ता.वेळ | ११/०३/२०२० चे २१/३४ वाजता |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | होय |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकानी फिर्यादी आपल्या घरी हजर असतांना यातील शेजारी राहणारा आरोपी याने फिर्यादी याला शिवीगाळ केली तर फिर्यादी ने आरोपीला म्हटले की. शिवीगाळ का करतो असे विचारले असता आरोपी याने म्हटले की, इकडे ये तुला कापतो असे म्हणुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली.अशा फि.चे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ विनायक धुरंधर ब.न.७४४ पो स्टे वलगांव |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | वलगांव |
| अप क्र. व कलम | १४७/२०२० कलम २९४,३२३,५०४,५०६(ब),भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | एक महीला |
| आरोपी | नरेंद्र नानाजी देशमुख वय ४० वर्ष रा.वलगांव |
| ०घटनास्थळ | जबरेश्वर चौक वलगांव |
| घटना.ता.वेळ | ११/०३/२०२० चे १९/०० वा दरम्यान |
| दाखल ता.वेळ | ११/०३/२०२० चे २१/५४ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे शेजारी राहत असुन फिर्यादीचा मुलगा सोहम हा मोकळ्या जागेत बसला होता.त्यास म्हटले की दारु पिला आहे काय घरात चल तेवढ्यात शेजारी राहणारा आरोपी नारायण नानजी देशमुख हा तेथे येवुन अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तुम्ही येथे राहु नका एखाद्या दिवशी तुमचा मुडदा पाडतो असे म्हणुन आता तुया मुलाचा मर्डर करतो असे म्हणुन आरोपी याने फिर्यादीचे मुलास थापडा बुख्यांनी मारहान करुन शिवीगाळ करुन निधुन गेला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ विनायक धुरंधर ब.न.७४४ पो स्टे वलगांव |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१५

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | सिटी कोतवाली |
| अप क्र. व कलम | ९५/२०२० कलम ३७९ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | यवतमाळ ते स स्टँन्ड अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ११/३/२०२० चे ०७.५० ते १०.०५ वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. ११/३/२०२० चे १६.३० वा. |
| आरोपी | अज्ञात |
| हकिकत | हकिकत अशाप्रकारे आहे की फिर्यादी व त्यांचे पती लहान मुलासह यवतमाळ वरून बस क्र. ४१७० मध्ये बसुन अमरावती घरी येण्याकरिता निघाले त्यांनी त्यांची ट्रॉली बँग घेवुन त्यामध्ये वरिल दागिणे च्या दोन छोटया पर्स ठेवुन बँगला चैन लावुन बसमध्ये सिटवर ठेवली व फिर्यादी बसचे किसऱ्या सिटवर बसली येवतमाळ वरून अमरावती बस स्थानकावर उतरल्या व तेथुन अँटो करून पतीसह घरी गेल्या घरी गेल्यानंतर फिर्यादी यांनी ट्रॉली बँग उघडुन पाहिली असता त्यांना त्यामध्ये ठेवलेल्या दागदागिण्यांच्या दोन पर्स दिसुन आल्या नाही फिर्यादी व त्यांचे पती यवतमाळ ते अमरावती बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने ट्रॉली बँग उघडुन दोन छोट्या पर्ससह ७९.७५ ग्रॅम सोन्याचे दागिणे कि.अं. २,८७,२००/- ९) एम.आय. कंपणीचा पॉबर बँक कि. अंदाजे ५००/- असा एकुण २,८७,७००/- रू. चा माल चोरून नेला. अशा फिर्यादी चे जबानी रीपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पो उप नि चाटे, पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |

## भाग -६ गुन्हे बाबत-निरंक

## जुगार रेड -१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | वलगांव |
| अप क्र. व कलम | १४५/२०२० कलम १२(अ) म.जु.का. |
| फिर्यादी नाव व पत्ता | सरतर्फ पोहेकाँ सुनील मेटकर ब..न.१२१९ पो स्टे वलगांव |
| आरोपी | सोपान सुर्यभान ठाकरे वय ४५ वर्ष रा.खारतळेगांव |
| ०घटनास्थळ | ग्राम खारतळेगांव |
| घटना.ता.वेळ | ११/०३/२०२० चे १३/३० वाजता दरम्यान |
| दाखल ता.वेळ | ११/०३/२०२० चे १८/३४ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळि व ठिकानी यातील नमुद आरोपी हे लोकांकडुन १ ते १० आकड्याचे पैसे घेवुन हार जितीचा खेळ खेळवित असतांना मिळुन आले .त्याचे ताब्यातुन वरली मटकी च्या चिठ्या एक डाँट पेन व नगदी २५०/-रुपये असा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला .अशा फिर्यादीचे लेखि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ पाडुरंग दंडारे ब.न.६२५ पो स्टे वलगांव |

## प्रोव्हीशन रेड-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | वलगांव |
| अप क्र. व कलम | १४४/२०२० कलम ६५(ई) महा.दा.का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फ पोहेकाँ विनायक धुरंधर ब.न.७४४ पो स्टे वलगांव |
| आरोपी | एक महीला |
| घटनास्थळ | समता नगर वलगांव |
| घटना.ता.वेळ | ११/०३/२०२० चे १३/०० वाजता |
| दाखल ता.वेळ | ११/०३/२०२० चे १८/२४ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळि व ठिकानी यातील नमुद आरोपी ही आपले घरा समोर विनापरवाना देशी दारु ची विकरी करीत असतांना मिळुन आली.तिचेवर पंचासमक्ष प्रो रेड केला असता तिचे ताब्यातुन ८ नग देशी दारु बाँबी संत्र्याच्या १८० मी ली ची सिलबंद पावट्या कि.४४०/-चा माल मिळुन आला.अशा फि.चे लेखि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ पाडुरंग दंडारे ब.न.६२५ पो स्टे वलगांव |

## अकस्मात मृत्यु-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोस्टे फ्रेजरपुरा |
| मर्ग क्र. व कलम | मर्ग नं. २१/२०२० कलम १७४ जा.फौ. |
| फिर्यादि नाव व पत्ता | अंकुश ओमप्रकाश वानखडे वय ३२ वर्ष रा. यशोदा नगर नं. १ गल्ली नं. २ अमरावती |
| मतक | ओमप्रकाश देविदास वानखडे वय ६३ वर्ष रा. . यशोदा नगर नं. १ गल्ली नं. २ अमरावती |
| घटनास्थळ | यशोदा नगर नं. १ गल्ली नं. २ अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १०/३/२०२० चे २३.००वा.ते ११.०३.२०२० चे ००.३० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. ११/०३/२०२० चे ०४.०९ वा. |
| मृत्यु ता. वेळ | दि. १०/३/२०२० चे २३.००वा.ते ११.०३.२०२० चे ००.३० वा. दरम्यान |
| मरणाचे कारण | गळफास घेवुन आत्महत्या |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी अंकुश ओमप्रकाश वानखडे वय ३२ वर्ष रा. यशोदा नगर नं. १ गल्ली नं. २ अमरावती यांनी पोस्टे ला येवुन जबाणी रिपोर्ट दिला की, त्यांचे वडिल नामे ओमप्रकाश देविदास वानखडे वय ६३ वर्ष हे गेल्या काही महिण्यापासुन बिमार होते व ते मानसिक रुग्ण होते त्यांचा ईलाज मनोरुग्ण स्पेशालीस्ट अनुपम राठोड यांचेकडे सुरु होता व त्यांनी नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी मानसिक तणावात येवुन घरातील लहान मुलांचे पाळण्याचे दोरीला गळफास घएवुन आत्महत्या केली अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व इर्विन मेमो वरुन सदरचा मर्ग दाखल करुन सदर मर्गचे प्राथमिक तपासकामी सहपोउपनि सुरेंद्र ढोके ब.नं. ६१८ व पोकॉ ८१६ सोबत असे डिओ सा. आदेशाने इर्विन दवाखाना येथे रवाना झालो. |
| तपासी अधिकारी | सहपोउपनि अरुण मेश्राम ५८६ पोस्टे.फ्रेजरपुरा अमरावती. |